NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## १७ वा दीक्षांत समारंभ
## जाहीर निवेदन



पदवी/पदविका प्रदान करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचा सतरावा वार्षिक दीक्षांत समारंभ साधारणपणे **जानेवारी/फेब्रुवारी/मार्च २०२२** मध्ये संपन्न होणार आहे. या समारंभात जे विद्यार्थी पदवी/पदवीका प्रमाणपत्रे घेऊ इच्छिता, अशा विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या शुल्कासह ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारले जाणार आहेत.

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा तपशिल**

दिनांक **२/१२/२०२१** पासून **२४/१२/२०२१** पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची मुदत असून त्याचे शुल्क खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **तपशिल** | **शुल्क** | **शुल्क स्वीकारायची पद्धत** |
|---|---|---|---|
| १ | माहे मार्च/एप्रिल/मे २०१६ ते मार्च/एप्रिल/मे २०२१ या दरम्यान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता | रु. ६००/- | फक्त Online Payment द्वारे |
| २ | माहे मार्च/एप्रिल/मे २००५ ते ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २०१५ या दरम्यान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता | रु. ९००/- | |

विद्यार्थ्यांकरिता नमूद केलेल्या मुदतीच्या दिनांकानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांनी दीक्षांत समारंभाचा Online भरलेला अर्ज (Hard Copy) विद्यापीठात जमा करण्याची अंतिम **तारीख २९/१२/२०२१** असेल. त्यानंतर कोणत्याही परस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासंबंधी संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या (http://su.digitaluniversity.ac) या संकेतस्थळावर (Student login करुन विद्यार्थ्यांनी अर्ज भरावे) Convocation या Link वर उपलब्ध आहे. दीक्षांत समारंभाची तारीख व वेळ नंतर जाहीर केली जाईल व याची माहिती विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

**महत्वाची सूचना -**

१) **ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्ड क्रमांकाची नोंद करणे अनिवार्य आहे.**
२) १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक (PRN) असलेल्या विद्यार्थ्यांनी आपले अलीकडील छायाचित्र (फोटो), सही, अंतिम वर्षाची गुणपत्रिका व आधारकार्ड Scan करुन Upload करावे अन्यथा या पूर्वीचे उपलब्ध असलेले छयाचित्र/ स्वाक्षरी पदवी प्रमाणपत्रावर छापले जाईल.
३) पदवी प्रमाणपत्र टपालाद्वारे मिळविण्याकरीता आवश्यक असलेला पत्ता, दीक्षांत समारंभाची माहिती प्राप्त होण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी हा ऑनलाईन अर्ज भरताना अद्यावत (Update) करणे आवश्यक आहे.
४) पदवी अर्ज भरताना काही अडचणी आल्यास विद्यार्थी सहायता केंद्रातील **०२१७/२७४४७७१ ते ७८ (विस्तारीत क्रमांक- १७५)व दीक्षांत विभागातील विस्तारीत क्रमांक- १३५** या दुरध्वनीवर, sfc@sus.ac.in व convocation@sus.ac.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.
५) संपूर्ण अर्ज भरल्यानंतर त्या अर्जाची प्रत, अंतिम वर्षाची गुणपत्रिका, प्रोव्हिजनल सर्टिफिकेट, शुल्क भरल्याची पावती व आधार कार्ड यांची सत्यप्रत अर्जासोबत जोडून विद्यापीठात **दि - २९/ १२/२०२१** पर्यंत जमा करावे.

स्थळ- सोलापूर
जा.क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/ १५०५/दिनांक- १/१२/२०२१

सही/-
(डॉ.एस.एस.गणपूर)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन विभाग